# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २४/०१/२०१९ रोजी (का.प.क्र.२०) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

गुरुवार दिनांक २४/०१/२०१९ रोजी (का.प.क्र.२०) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह'' येथे सकाळी ११:३० वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त, श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०२. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०३. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०४. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०५. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०६. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
०७. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
०८. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
०९. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
१०. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
११. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : महानगरपालिकेचे अधिकारी श्रीमती.डॉ.निता पाडळकर यांनी व त्यांचे टिमने अवैध गर्भलिंग निदान चाचणी केंद्रावर कारवाई करुन मोठा आदर्श समोर ठेवला आहे. त्यामुळे त्यांचे व त्यांच्या टिमचे अभिनंदन करण्यात यावे.

(जो अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला त्यास श्रीमती.सत्यभामा शिंदे, श्री.अब्दुल नविद अनुमोदन देतात.)

मा.सभापती : श्रीमती.डॉ.पाडळकर मॅडम यांनी चांगल्याप्रकारे कार्यवाही केली आहे. सभागृहातर्फे त्यांचे व त्यांच्या टीमचे अभिनंदन करण्यात येते.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : शासनाचा जीआर आला होता त्याबाबत वारंवार सभागृहात बोलले गेले. गुंठेवारी घरे रेग्युलर करण्या करिता त्याचा स्वतंत्र कक्ष सुध्दा स्थापन झाला होता. संबंधीत अधिकारी यांनी सांगितले होते की, आता ऑनलाईन सुध्दा फॉर्म भरता येतो. ऑनलाईन किती घरे नियमित केले आहे?

कार्य.अभियंता(न.र) : फाईल ऑफलाईन घेतल्या जातात घरे रेगयुलर करण्यासाठी शासनाने जीआर मध्येच मुदत वाढुन दिलेली आहे.

मा.सभापती : जास्तीत जास्त लोकांना या योजनेचा फायदा होईल या दृष्टिने काम करावे. गुंठेवारी रेग्युलर कसे करता येईल त्याचा विचार व्हावा.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : १ सप्टेंबर पासुन अभय योजना राबवण्यात आली होती आता पर्यंत किती अनाधिकृत होर्डिंग्स् अधिकृत केल्या त्याची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : होर्डिंगच्या संदर्भात इनलिगल होर्डिंग्स् लिगल करुन घेण्यासाठी अभय योजना राबवण्यात आली होती. खुलासा देण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी : त्याबद्दल आताच माहिती नाही. श्री.काझी यांच्याकडे त्याची माहिती आहे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : शहरामध्ये मोकाट कुत्र्यांचा खुप मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. डॉग व्हॅन आणि कुत्र्यांवर नसबंदी होणार आहे का याची कुठलीच माहिती सदस्यांना नाही. आदेशित केले होते की कुत्रे पकडण्याची गाडी रात्री फिरायला पाहिजे. परंतु तसे काही होतांना दिसत नाही.

मा.अति.आयुक्त : दोन नवीन डॉग व्हॅन तयार केल्या आहेत. यासाठी आवश्यक कर्मचारी सुध्दा घेत आहोत. पुर्ण पाच डॉग व्हॅन आहेत त्यापैकी तीन रात्री साठी ठेवण्यात आल्या आहे. पुर्ण आराखडा तयार केला आहे दोन दिवसात सर्व स.सदस्यांना माहिती देण्यात येईल. सेंट्रल नाका येथे सध्या एक ऑफरेशन थेटर आहे. तिथे शेजारी एक रिकामे गोडाउन आहे त्याचे इस्टिमेंन्ट तयार केले आहे. तिथे तीन ऑफरेशन थेटर आणि पकडलेले कुत्रे ठेवण्यासाठी शेड बांधायचे आहे.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : मागच्या बैठकीमध्ये सांगितले होते की, अशोकनगर, शिवनेरी कॉलनी या भागामध्ये एक महिन्यापासुन दुषित पाण्याचा पुरवठा होत आहे. अनेक वेळा प्रश्न मांडला कार्यवाही का होत नाही?

मा.सभापती : सदस्यांच्या वार्डामध्ये दुषित पाण्याचा पुरवठा होत आहे मागच्या बैठकीत आदेश देऊन सुध्दा काम का होत नाही.

कार्य.अभियंता(पा.पु) : आजच ही तक्रार आली आहे. आठ दिवसापुर्वी कर्मचारी कामासाठी लावले होते. सोमवार पासुन सर्व कॉन्ट्रॅक्टरने पेमेंट न मिळाल्याने कामे बंद केली आहे.

मा.सभापती : श्री.पाटणी, कॉन्ट्रॅक्टरचे पेमेंट कधी देणार आहोत.

मुख्यलेखा अधिकारी : सर्वसाधारण सभेमध्ये सुध्दा मा.महापौरांनी याबाबत आदेश केले आहे. पुढच्या आठवड्या पर्यंत बिल देणार आहोत.

मा.सभापती : लवकरात लवकर ते पेमेंट देण्यात यावे आणि दुषित पाण्याचा प्रश्न सोडवण्यात यावा.

श्री.अब्दुल नविद : माझ्या वार्डामध्ये पाण्याची पाईपलाईन टाकण्यासाठी खोदकाम करुन ठेवले आहे. ठेकेदाराने काम बंद केले आहे. काम चालु करण्यासाठी आदेश देण्यात यावे. तातडीने काम करावे.

मा.सभापती : सदस्यांच्या वार्डात अर्धवट काम झाले आहे लवकरात लवकर ते चालु करण्यात यावे.

श्रीमती.खान नसरीन : बारापुल्ला रोडवर लाईन व्हॉल टाकण्यात आलेले नाही सहा महिन्यापासुन काम बंद आहे.

मा.सभापती : तिथे लाईन टाकुन झाली आहे फक्त दोन व्हॉल बसवायचे आहे. आजच्या आज तातडीने ते काम करण्यात यावे.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : त्रिमुर्ती चौकातले सुलभ शौचालय अजुनही पाणी उपलब्ध होत नसल्याने चालु झालेले नाही.

कार्य.अभियंता(पा.पु) : सुलभ शौचालयाला जाऊन पाहणी करण्यात येईल. चौकशी करुन बघतो.

मा.अति.आयुक्त : तिथे फक्त पाणी देण्याची व्यवस्था करुन देण्यात यावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : व्यवसायिक कॉम्पलेक्स् साठी बांधकाम परवानगी घेतांना जे स्वच्छतः गृह त्याच्यामध्ये होते ते दिसुन येत नाही. आदेशित केले होते की, त्याचे सर्व्हेक्शन करा परंतु आता पर्यंत ते करण्यात आले नाही.

कार्य.अभियंता(न.र) : पार्किंगचे सर्व्हेक्शन करत असतांना त्यांना स्वच्छता गृहाचे सुध्दा सर्व्हेक्शन करण्याचे सुचना देतो.

श्रीमती.सायरा बानो : हनुमान गल्लीमध्ये दोन महिन्यापासुन ड्रेनेजचे काम करण्यासाठी अधिकाऱ्याशी पाठ पुरावा करत आहे. अजुन सुध्दा काम झाले नाही.

कार्य.अभियंता(ड्रे) : देयक प्रलंबित असल्यामुळे गुप्तेदार काम करण्यास तयार नाही.

अति.आयुक्त : याबाबत मा.आयुक्तांशी चर्चा केली आहे. आधी पाण्याचे देयक देणार आहोत नंतर टप्या-टप्याने ड्रेनेजचे आणि इतर देयक देण्याचे ठरवले आहे. तो पर्यंत ठेकेदारांना कामे करण्यासाठी सांगण्यात येईल.

श्री.अब्दुल नविद : मागच्या बैठकीपासुन वाचनालया बदल बोलत आहे. अति.आयुक्तांनी सांगितले होते की, आठ दिवसात तेथे पुस्तके देण्यात येतील.

मा.सभापती : मागच्या बैठकीमध्ये सांगण्यात आले की, पुस्तकांची ऑर्डर दिलेली आहे त्याचे काय झाले?

मा.अति.आयुक्त : आज वाचनालय प्रमुखांना बोलावुन पुस्तके वाटण्याची व्यवस्था करण्याबाबत सुचना देतो.

श्रीमती.खान नसरीन : गरम पाणी येथे हॉस्पिटल मधील कर्मचाऱ्याची बदली करण्यात आली होती. त्यांना परत पाठवण्यात आले नाही.

वैद्यकीय अधिकारी : लवकर या बाबत कार्यवाही होईल.

श्रीमती.खान नसरीन : कोहिनुर कॉलनी हॉलचे काहीच काम झाले नाही. त्याचा खुलासा करण्यात यावा.

विधी सल्लागार : आजच ती फाईल बघुन घेते. योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्रीमती.सत्यभामा शिंदे : एन-१, प्रोजोन मॉल, गोल्डन सिटी केअर भागा समोर ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी जागा असतांना त्यांनी मागच्या बाजुने स्मशान भुमि कडुन ड्रेनेज लाईन टाकली आणि ओपन नाल्यामध्ये ड्रेनेजचे पाणी सोडले. त्या लाईनचे पाणी जुनी आणि नवीन एसटी कॉलनी, अंबिका नगर, लोकशाही कॉलनी, राजु गांधी नगर, संतोषीमाता नगर या भागामधील नागरीकांच्या नळामध्ये, बोरमध्ये पाणी जात आहे. नागरीकांनी विचारल्यावर अधिकारी सांगतात की, पाणी कुठून येते आम्हाला माहित नाही. नागरीकांना उडवा उडवीचे उत्तर दिले जाते.

वार्ड अधिकारी(ड्रेनेज) : सदर प्रकरण कालच माझ्या निदर्शनास आले आहे. तपासणी केली आहे. लाईन फुटलेली असेल ते बघुन दोन दिवसामध्ये काम करण्यात येईल.

मा.सभापती : आजच्या आज तपासुन जे काही आवश्यक असेल ते करा आणि काय कार्यवाही केली ती संबंधीत नगरसेविकांना सुध्दा कळवावे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : कचरा प्रक्रियेसाठी नऊ ठिकाणी मशिन कार्यान्विय करण्यात येणार होत्या ते बसवण्यात आलेले नाही आणि शेडचे काम सुध्दा झालेले नाही. याचे कारण काय दिरंगाई का होत आहे.

कक्ष प्रमुख(घनकचरा) : रमानगरमध्ये शेडचे काम पुर्ण झाल्यावर दोन मशिन बसवणार आहोत.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : शेडचे काम कधी होणार आहे.

कक्ष प्रमुख(घनकचरा) : शेडची करण्याची कार्यवाही श्री.काझी यांच्या मार्फत केली जाते. आणि तेथील कचरा संकलनचे काम २७ तारखेपासुन सुरु होणार आहे.

श्री.सिध्दांत शिरसाट : बीड बाय पास अतिक्रमण बाबत प्रश्न केला होता, काय झाले. खुलासा करण्यात यावा.

सहा.संचालक(न.र) : बीड बाय पास अतिक्रमणाबाबत कोर्ट मॅटर झाले होते. मा.कोर्टाने सांगितले होते की, सगळ्यांची हेरिंग घेऊन कार्यवाही करायची आहे. त्याचा सगळा अहवाल तयार करुन पाठवला आहे. माहिती घेतल्या नंतर पोलिस बंदोबस्त घेऊन ते काढण्यात येईल.

श्री.सिध्दांत शिरसाट : दोन वर्षापासुन रेल्वेस्टेशन येथील पेट्रोल पंप बाबत बोलत आहे. कार्यवाही काय झाली?

सहा.संचालक(न.र) : १ कोटी ४५ लाखाचे व्हॉवचर अकाऊंटला पाठवले आहे. पैसे मिळाल्यावर भुसंपादन कार्यवाही करु.

श्री.सिध्दांत शिरसाट : व्हॉवचर आले आहे का नाही ते सांगण्यात यावे.

मुख्यलेखा अधिकारी : याबाबत माहिती नाही. चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

श्री.सिध्दांत शिरसाट : रेल्वेस्टेशनच्या बाजुला जनता हॉटेल आहे. त्यावर मनपाने अतिक्रमणाची कार्यवाही केली होती. ते लोक वर्कबोर्ड मध्ये गेले त्यावर त्यांनी स्टे आणला. त्याला एक वर्ष झाले. त्याचे पुढे काय झाले? अजुन सुध्दा प्रकरण चालु आहे का? विधी सल्लागार याचा खुलासा करावा.

विधी सल्लागार : त्या जागेबदल म्हणणे आहे की, जी भुसंपादन केलेली जागा आहे त्याच्यामध्ये ते बसले नाही म्हणुन कोर्टाने त्याच्यामध्ये कोर्ट कमिशन नियुक्ती केली आहे. संबंधीत सगळ्या विभागांना उपस्थित राहण्यासाठी पत्र पाठवलेले आहे.

श्रीमती.राखी देसरडा : या शहरात, संशयीत अतिरेक्यांनी रासायनिक हल्ल्याचा कट रचला होता असे वृत्तपत्रामध्ये वाचले आहे. जो कट रचना आहे त्यापैकी नऊ संशयीत धरले आहे. त्यापैकी दोन औरंगाबाद शहरातलेच आहेत. त्यांनी सांगितले की, जलकुंभाची रेखी केली होती. त्या संदर्भात पाणी पुरवठा विषयी काय उपाय योजना केलेली आहे. यामध्ये नागरीकांच्या जिवाला धोका आहे.

अति.आयुक्त : याबाबत जलकुंभाजवळ कर्मचारी असतातच त्यांच्या बरोबर सुरक्षारक्षक नेमायचे सुध्दा ठरवलेले आहे. सी.सी.टीव्ही बसवण्याचे सुध्दा नियोजन चालु आहे.

मा.सभापती : काल ते संशयीत लोक धरले गेले नसते तर लाखो लोकांचे जिव जाण्याचा धोका होता. अतिशय महत्वाचा विषय आहे त्यामुळे जलकुंभावर सी.सी.टी.व्ही. बसवणे, सुरक्षारक्षक देणे जी काही उपाय योजना करणे आवश्यक आहे ती तातडीने केली पाहिजे. शहरामध्ये जिथे-जिथे पाण्याच्या टाक्या आहेत तिथे या सगळ्या गोष्टी केल्या पाहिजे.

**विषय क्र. १९४ : (कर्मचाऱ्याचे अपील)** (दि.१४/०१/२०१९ (का.प.क्र.१९) रोजीच्या सभेतील स्थगीत विषय क्र.१७५)

श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे, पाणी पुरवठा मजुर (निलंबीत) यांना वॉर्ड-ई कार्यालय, महानगरपालिका औरंगाबाद येथे कार्यरत असतांना पाणीपट्टी/मालमत्ता कराची रक्कम मनपा फंडात जमा न करणे, सदर रकमेचा अपहार केल्यामुळे, प्रथमतः संबंधीतास निलंबीत करून खाते चौकशी करण्यात आलेली आहे.

खाते चौकशी अंती श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे, पाणी पुरवठा मजुर (निलंबीत) हे कर्मचारी दोषी आढळून आल्यामुळे व त्यांचे विरूध्दचे दोषारोप सिध्द झाल्यामुळे,श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे, पाणी पुरवठा मजुर (निलंबीत) यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे प्रकरण तीन मधील उपनियम (५) १ (सात) अन्वये महापालिकेच्या सेवेतून कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-२/८०३/२०१६, दि.०७/०७/२०१६ अन्वये सक्तीने सेवानिवृत्त करण्यांत आलेले आहे. संबंधीताने या आदेशाविरूध्द स्थायी समितीकडे अपील सादर केलेले आहे. करीता संबधीताने स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचारविनिमय करून निर्णय घेणे.

मा.सभापती : विषय क्र.१९४ ते २०३ पर्यंत मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे, पाणी पुरवठा मजुर (निलंबीत) यांना वॉर्ड-ई कार्यालय, महानगरपालिका औरंगाबाद येथे कार्यरत असतांना पाणीपट्टी/मालमत्ता कराची रक्कम मनपा फंडात जमा न करणे, सदर रकमेचा अपहार केल्यामुळे, प्रथमतः संबंधीतास निलंबीत करून खाते चौकशी करण्यात आलेली असल्याने, तसेच खाते चौकशीअंती श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे, पाणी पुरवठा मजुर (निलंबीत) हे कर्मचारी दोषी आढळून आल्यामुळे व त्यांचे विरूध्दचे दोषारोप सिध्द झाल्यामुळे, श्री.भाऊसाहेब रूंजाजी कांबळे, पाणी पुरवठा मजुर (निलंबीत) यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे प्रकरण तीन मधील उपनियम (५) १ (सात) अन्वये महापालिकेच्या सेवेतून कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/आस्था-२/८०३/२०१६, दि.०७/०७/२०१६ अन्वये सक्तीने सेवानिवृत्त करण्यांत आलेले असल्यामुळे, संबंधीताने या आदेशाविरूध्द स्थायी समितीकडे सादर केलेले अपील मंजूर करण्यांत येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३८ अंतर्गत मसनतपुर येथे कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक एसएसआर-२०१७-१८ नुसार र.रू.३१,१९,९९८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षक मधुन प्रस्तावित करण्यात आला आहे.

करीता अंदाजपत्रक र.रू.३१,१९,९९८/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३८ अंतर्गत मसनतपुर येथे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.३१,१९,९९८/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०९ अंतर्गत मयुरनगर मधील विविध ठिकाणच्या रस्त्यांची सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.४२,६८,१००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची २०१७-१८ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित २०१८-१९ मधील नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.४२,६८,१००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०९ अंतर्गत मयुरनगर मधील विविध ठिकाणच्या रस्त्यांची सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.४२,६८,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर अंतर्गत नर्सरी पासून ते स्वामी हेल्थ क्लब पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३८,३६,५००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची २०१५-१६ नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित २०१८-१९ मधील नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३८,३६,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ स्वामी विवेकानंदनगर अंतर्गत नर्सरी पासून ते स्वामी हेल्थ क्लब पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३८,३६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२५ गणेश कॉलनी अंतर्गत रोजपार्क मध्ये कॉंक्रीटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २०१७-१८ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.३५,३१,२०४/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील वार्ड क्र.०३ स्पील ओव्हर पान क्र.६५ अ.क्र.१४१ वर रक्कम रू.४४.०० लक्ष तरतुदमध्ये उपलब्ध नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षकात ठेवण्यात आलेल्या ४४.०० लक्ष तरतुद मधुन करण्यात येणार आहे. प्रस्तावीत अंदाजपत्रकात विविध विकास कामे करणे इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाचे रक्कम रू.३५,३१,२०४/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२५ गणेश कॉलनी अंतर्गत रोजपार्क मध्ये कॉंक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.३५,३१,२०४/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५७ शहर मंजुर रस्ता विकास आराखडा मधील खासगेट ते बायजीपुरा १५.०० मी. डी.पी. रोड मधील उर्वरीत जीन्सी टॉवर ते जीन्सी पोलीस स्टेशन रस्ता व्हाईट टॉपींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन २०१७-१८ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले

असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.४९,८५,३००/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील वार्ड क्र.०३ स्पील ओव्हर पान क्र.७४ अ.क्र.७ वर र.रू.५०.०० लक्ष तरतुद मध्ये उपलब्ध नविन प्रो-पुअर बजेट नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षकात ठेवण्यात आलेल्या र.रू.५०.०० लक्ष तरतुद मधुन करण्यात येणार आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात विविध विकास कामे करणे इ. बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाचे रक्कम रू.४९,८५,३००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७ शहर मंजुर रस्ता विकास आराखडा मधील खासगेट ते बायजीपुरा १५.०० मी. डी.पी. रोड मधील उर्वरीत जीन्सी टॉवर ते जीन्सी पोलीस स्टेशन रस्ता व्हाईट टॉपींग करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.४९,८५,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९९ अंतर्गत श्रीकृष्णनगर ते चाणक्यपुरी पर्यंत नाल्यास आर.सी.सी. संरक्षित भिंत बांधणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या डी.एस.आर. २०१५-२०१६ नुसार रक्कम रूपये ४९,५२,०००/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.०३/१२/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदर कामाकरीता आर्थिक तरतुद ही मनपा अर्थसंकल्प २०१७-२०१८ मध्ये लेखाशिर्ष नाला ट्रेनिंग कामे झोन क्र.०७ एस.सी.आर. पृष्ठ क्र.६०, अ.क्र.०१, रक्कम रू.५०.०० लक्ष उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये ४९,५२,०००/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९९ अंतर्गत श्रीकृष्णनगर ते चाणक्यपुरी पर्यंत नाल्यास आर.सी.सी. संरक्षित भिंत बांधणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये ४९,५२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.६, एन-११ येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राची तळमजल्यावरील जुनी इमारत दुरूस्ती करणेचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम दरसुची सन २०१५-१६ नुसार तयार करण्यात आलेले असून अं.प. र.रू.२१,७२,५८८/- चे आहे. सदर दुरूस्तीचे काम हे एन.यु.एच.एम. या शासनाच्या निधीमधून प्रस्तावित आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक मान्यतेअंती रितसर निविदा बोलविण्यात आल्या असता, तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. पेक्षा १६.१३ टक्के कमी दराची निविदा मे.एस.एम. कंस्ट्रक्शन कंपनी, औरंगाबाद यांची असल्याने त्यांचे सोबत करारनामा करण्यात आला. तसेच दि.२२/१२/२०१७ रोजी कार्यादेश निर्गमित करून कामास सुरूवात करण्यात आली.

मूळ मंजूर र.रू.२१,७२,५८८/- च्या मर्यादेत सदर काम प्रगतीपथावर असतांना आरोग्य विभागाच्या स्टाफच्या गरजेनुसार व मागणीनुसार आणि प्रत्यक्ष स्थळावरील स्थितीनुरूप अतिरिक्त आवश्यक बाबींची कामे करणेसाठी आरोग्य अधिकारी यांनी वेळो-वेळी सुचविले आहे. तसेच मा.आयुक्त यांचेकडील आढावा बैठकीत, या कामाचे सुधारीत अं.प. तयार करून वाढीव कामे तातडीने पूर्ण करण्यास आणि आरोग्य केंद्रात प्रसुतीगृह सुरू करणेचे देखील ठरविण्यात आले आहे.

सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रू.४८,९३,१५३/- चे तयार करण्यात आले असून त्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विश्लेषण | रक्कम रूपये |
|---|---|---|
| ०१. | मुळ अंदाजपत्रकातील परिशिष्ट-ब मधील बाबींची वाढीव कामासह | ३१,७५,४८७/- |

| | | |
|---|---|---|
| | (र.रू.३७,८६,२०१/-) होत आहे. परंतु निविदा दर १६.१३ टक्के कमी असल्यामुळे यासाठी प्रत्यक्ष लागणारी रक्कम रू. | |
| ०२. | अतिरिक्त बाबींची रक्कम रू. | १७,१७,६६६/- |
| | **एकूण** | ४८,९३,१५३/- |

आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा सदस्य सचिव यांचे अहवालानुसार या कामासाठी एन.यु.एच.एम. च्या शासकीय निधीमधून र.रू.१०,५६,०००/- उपलब्ध आहे. उर्वरीत निधी रक्कम रू.३८,३७,१५३/- मिळणेसाठी आयुक्त, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तथापी प्रस्तावित सुधारीत अंदाजपत्रकानुसार दुरूस्तीचे संपूर्ण काम पूर्ण करणेसाठी रक्कम रू.३८,३७,१५३/- चा निधी महानगरपालिकेच्या फंडातून तुर्त उपलब्ध करणेस आणि सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.४८,९३,१५३/- नुसार मूळ निविदेमधील परिशिष्ट-ब च्या बाबी मंजूर निविदा दर १६.१३ टक्के कमी दराने आणि अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने मे.एस.एम. कंस्ट्रक्शन कंपनी, औरंगाबाद यांचेकडून काम करून घेणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.६, एन-११ येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राची तळमजल्यावरील जुनी इमारत दुरूस्ती करणेचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार दुरूस्तीचे संपूर्ण काम पूर्ण करणेसाठी रक्कम रू.३८,३७,१५३/- चा निधी महानगरपालिकेच्या फंडातून तुर्त उपलब्ध करणेस आणि सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.४८,९३,१५३/- नुसार मूळ निविदेमधील परिशिष्ट-ब च्या बाबी मंजूर निविदा दर १६.१३ टक्के कमी दराने आणि अतिरिक्त बाबी अंदाजपत्रकीय दराने मे.एस.एम. कंस्ट्रक्शन कंपनी, औरंगाबाद यांचेकडून काम करून घेणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २०२ :</u>**

विषय : वार्ड क्र.३५ अंतर्गत जयभवानी चौक ते संत कबीर चौक ते एच.पी. गॅस संभाजी चौक एम.आय.डी.सी. रोड नारेगाव पर्यंत पुनर्डांबरीकरण करणे. या कामाचे ठेकेदार मे.व्ही.बी.ए.इन्फ्रा यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.१५ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.१,०७,८०,३९१/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-२०१८-AMCA-296100-१

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.०५, सिडको |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.३५ अंतर्गत जयभवानी चौक ते संत कबीर चौक ते एच.पी. गॅस संभाजी चौक एम.आय.डी.सी. रोड नारेगाव पर्यंत पुनर्डांबरीकरण करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण सभा दि.०९/०२/२०१८ विषय क्र.२५६ र.रू.१,३१,७०,९११/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.१,३१,७०,९११/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०९ एप्रिल २०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ११ एप्रिल २०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | पाच (०५) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.व्ही.बी.ए. इन्फ्रा | र.रू.१,०७,८०,३९१/- | अं.प.दरापेक्षा १८.१५ टक्के कमी दराने |
| ०२. | मे.ए.एस.कंस्ट्रक्शन | र.रू.१,११,९२,६४०/- | अं.प.दरापेक्षा १५.०२ टक्के कमी दराने |
| ०३. | श्री.मोहम्मद अहेमद सिद्दिकी | र.रू.१,१४,८८,९८६/- | अं.प.दरापेक्षा १२.७७ टक्के कमी दराने |
| ०४. | मे.ड्रिमलॅण्ड कंस्ट्रक्शन | र.रू.१,१६,५४,९३९/- | अं.प.दरापेक्षा ११.५१ टक्के कमी दराने |
| ०५. | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग | र.रू.१,१९,८५,४११/- | अं.प.दरापेक्षा ९.०० टक्के कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | आहे. |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मे.व्ही.बी.ए.इन्फ्रा यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.१५ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.१,०७,८०,३९१/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ अंतर्गत जयभवानी चौक ते संत कबीर चौक ते एच.पी. गॅस संभाजी चौक एम.आय.डी.सी. रोड नारेगाव पर्यंत पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.व्ही.बी.ए.इन्फ्रा यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.१५ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.१,०७,८०,३९१/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २०३ :</u>**

विषय : वार्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत पहाडे कॉर्नर ते पुंडलिकनगर ग.क्र.०२ पर्यंत मंजूर असलेल्या आदर्श रस्त्याच्या उर्वरीत भागाचे कॉंक्रीटीकरण करणे, या कामाचे ठेकेदार मे.सहारा कंस्ट्रक्शन यांचेकडून ९.०० टक्के जास्त दराने टेंडर र.रू.५४४७३४२.२१/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-२०१८-AMCA-346620-१

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.०६ |
| २ | कामाचे स्वरुप | कॉंक्रीटींग करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ४९९७५६१.७२ |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | ई महासेल निविदा सूचना दि.२८/०८/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | --- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ३१/१०/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०३ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.सहारा कंस्ट्रक्शन | ५७९७६७१.३५ | १६.०१ टक्के जास्त दराने |
| ०२. | मे.अरबाज कंस्ट्रक्शन | ५८९७१२२.८३ | १८.०० टक्के जास्त दराने |
| ०३. | मे.मेघा बिल्डर | ६०४२०५२.१२ | २०.९० टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | मा.स्थायी समिती सभा दि.२२/१०/२०१८ विषय क्र.११५ |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून १६.०१ टक्के जास्त दराने निविदा भरली होती तथापी मा.अतिरिक्त आयुक्त महोदय, यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार दर निश्चिती अंती ठेकेदारांनी ९.०० टक्के जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे. करीता म्हणजेच टेंडर अटी शर्तीतील भाववाढ सुत्रानुसार अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७९ न्यायनगर अंतर्गत पहाडे कॉर्नर ते पुंडलिकनगर ग.क्र.०२ पर्यंत मंजूर असलेल्या आदर्श रस्त्याच्या उर्वरीत भागाचे कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६.०१ टक्के जास्त दराचे निविदाधारक ठेकेदार मे.सहारा कंस्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.०० टक्के जास्त दराने करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०४ :**

शासन अनुदान व डिफर्ड पेमेंट धर्तीवर महानगरपालिका फंडातुन औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यांचे व्हॉईट टॉपींग पध्दतीने कॉंक्रीट्रींग करणेच्या कामांकरीता या पुर्वी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या मे.जगप्रयाग इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची नियुक्ती रद्द करून तद्नंतर नव्याने निविदा मागविली असता (दुसऱ्या वेळेस) **प्राप्त मे.श्रीखंडे कन्सल्टंटन्स् प्रा. लि., मुंबई यांची पात्र एकच निविदा असुन दरवाटाघाटीअंती प्रकल्प किमंतीच्या १.१० % निविदा दराने निविदा पश्चात कामे करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव विचारार्थ सादर.**

**संदर्भ :- टेंडर क्र.** 2018_AMCA_381397_1.

| | | |
|---|---|---|
| १ | **खात्याचे नांव** | **प्र.कार्यकारी अभियंता<br>(शासन अनुदान रस्ते प्रकल्प)** |
| २ | **कामाचे स्वरुप** | **शासन अनुदान व डिफर्ड पेमेंट धर्तीवर महानगरपालिका फंडातुन औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यांचे व्हॉईट टॉपींग पध्दतीन कॉंक्रीट्रींग करणेच्या कामांकरीता निविदा पश्चात कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नियुक्ती करणे.** |
| ३ | **पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव?** | **लागु नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | निरंक |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दची दिनांक | महा - ई - टेंडर विभाग, महानगरपालिका औरंगाबाद. दै. दिव्य मराठी, दै. लोकमत – दि. २२/१२/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०७ दिवस |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २९/१२/२०१८ |
| ६ | एकुण किती टेंडर्स आली? | ०१ |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| १) | मे. श्रीखंडे कन्सल्टंटन्स् प्रा. लि., मुंबई | शासन अनुदान व डिफर्ड पेंमेंट रस्ते करीता मनपा फंड असे एकुण १.३७ कोटी. | प्रकल्प किंमतीच्या १.७७ टक्के दराने निविदापुर्व / निविदा पश्चात कामांकरीता प्राप्त दर असुन दरवाटाघाटीअंती प्रकल्प किंमतीच्या १.१० टक्के दराने निविदा पश्चात प्रकल्पाची कामे करणे. |

| | | |
|---|---|---|
| ७. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय, |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावशी सुसंगत आहे काय? | लागु नाही |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही, |
| ८. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | शासन अनुदान व डिफर्ड पेमेंट मनपा फंड |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय. |
| ९. | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | - |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | - |
| १०. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला | लागु नाही. |

<table>
<tr><td></td><td>आहे?</td><td></td></tr>
<tr><td></td><td colspan="2">शासन अनुदान व डिफर्ड पेमेंट धर्तीवर महानगरपालिका फंडातुन शहरातील विविध रस्त्यांचे व्हॉईट टॉपींग पध्दतीने कॉंक्रीट करण्याचे काम हाती घेण्यात येत असुन सदरील कामाचे योग्य पध्दतीने विस्तृत सर्वेक्षण करुन कामाचा प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदापुर्व व पश्चात सर्व कामे करणे, कामावर देखरेख करणे व कामे स्पेसिफिकेशननुसार करून घेणे या करीता मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.४३३ दि.१०/०५/२०१६ रोजी सपंन्न झालेल्या सभेत अनुभवी व तज्ञ प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करण्यास मान्यता झाल्यानुसार निविदा कार्यवाही करून मे.जगप्रयाग इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांची नियुक्ती करण्यात आली होती. यास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.१०४३ दि.२०/०५/२०१७ अन्वये मान्यता प्राप्त झाली होती. त्यानुसार संबंधीत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली असता, मे.जगप्रयाग इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी सदर प्रकल्पाचे काम करतांना कार्यालयात त्यांची निविदा अटी व शर्तीनुसार नमुद कामे न करणे व यासाठी आवश्यक कर्मचारी वर्गाची नियुक्ती न करणे, कार्यालयास वेळोवेळी सहकार्य न करणे इत्यादी संदर्भाने संबंधीतास कार्यालयातर्फे वेळोवेळी लेखी सुचना करूनही कामात सुधारणा न झाल्याने व यामुळे प्रकल्पाचे काम करतांना अडथळा निर्माण होत असल्याने संबंधीतास आढावा बैठकीत सुचना देऊनही त्यांच्या कामात सुधारणा न झाल्याने कार्यालयातर्फे नोटीस बजावुन विहित मुदतीत समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्याने मे.जगप्रयाग इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांची नियुक्ती रद्द करणेचा निर्णय घेतलेला आहे.<br><br>शासन अनुदान अंतर्गत पॅकेज निहाय (P-1 To P-4) निविदा प्रक्रियेअंती संबंधीत कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. तसेच डिफर्ड पेमेंट धर्तीवर महानगरपालिका फंडातुन शहरातील विविध रस्त्यांचे व्हॉईट टॉपींग पध्दतीने कॉंक्रीटींग करणेच्या कामाच्या निविदा मागविली असुन (दुसऱ्या वेळेस) निविदा उघडल्यानंतर निविदा प्रक्रियेअंती D-1 व D-2 या प्रकल्पाची कामे सुरु करण्यात येतील. उक्त नमुद दोन्ही प्रकल्प महानगरपालिकेचे महत्वाचे प्रकल्प असल्याने नमुद कामे दर्जात्मक व गुणवत्तापुर्व होणे गरजेचे आहे. सदर कामाचे शासन निर्णयानुसार तृतीय पक्ष तांत्रिक लेखा परिक्षण होणार आहे. यामुळे या प्रकल्पाचे निविदा पश्चात कामे करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करीता नव्याने निविदा मागविल्या असता (दुसऱ्या वेळेस) प्राप्त व पात्र एकच निविदा असुन मे.श्रीखंडे कन्सल्टंट प्रा. लि., मुंबई यांची १.७७ % of Project Cost (including GST as applicable) अशा दराने प्राप्त असुन निविदा गठीत समिती समक्ष दर वाटाघाटीअंती त्यांनी सदर दर निविदा पश्चात कामे करण्याकरीता १.१० % of Project Cost (प्रत्यक्ष होणाऱ्या प्रकल्पाच्या कामाच्या किंमतीस अधीन राहुन) असे दिले आहे. सबब उक्त नमुद नुसार या कामा करीता यापुर्वी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.जगप्रयाग इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची नियुक्ती त्यांचे निविदा अटी, शर्तीनुसार उक्त कारणामुळे रद्द करण्यांत आली आहे. व त्याऐवजी या कामाकरीता नव्याने निविदा मागविली असता (दुसऱ्या वेळेस) प्राप्त एकच पात्र निविदा मे.श्रीखंडे कन्सल्टंट प्रा. लि., मुंबई यांची असून दर वाटाघाटीअंती प्रकल्प किमंतीच्या १.१० % दराने निविदा पश्चात कामे करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.</td></tr>
</table>

श्रीमती.राखी देसरडा : विषय क्र.२०४ ला माझा विरोध आहे.

मा.सभापती : विरोध नोंदवून घेण्यात येतो, यामध्ये आकड्याचे करेक्शन आहे, त्यामुळे दुरुस्तीसह विषयाला मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन अनुदान व डिफर्ड पेमेंट धर्तीवर महानगरपालिका फंडातुन औरंगाबाद शहरातील विविध रस्त्यांचे व्हॉईट टॉपींग पध्द्तीने कॉंक्रीट्रींग करणेच्या कामांकरीता निविदा पश्चात कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नियुक्ती करणेसाठी प्राप्त झालेल्या पात्र एकच निविदाधारक मे.श्रीखंडे कन्सल्टंट प्रा. लि., मुंबई यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील कामे त्यांचेकडून १.१० % of Project Cost (प्रत्यक्ष होणाऱ्या प्रकल्पाच्या कामाच्या किंमतीस अधीन राहुन) दराने निविदा पश्चात कामे करून घेणेस तसेच या प्रस्तावा मध्ये शासन अनुदान व डिफर्ड पेंमेंट रस्ते करीता मनपा फंड असे एकुण १.३७ कोटी याऐवजी शासन अनुदान व डिफर्ड पेंमेंट रस्ते करीता मनपा फंड असे एकुण १३७ कोटी अशा दुरूस्तीसह मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २०५ : (कर्मचाऱ्याचे अपील)</u>**

श्री.सचिन हरिभाऊ गायकवाड (सद्यस्थितीत शिपाई) महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक या पदावरून शिपाई या पदावर कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१६/१६६५ दिनांक १४/१०/२०१६ अन्वये पदानवत केल्याच्या आदेशाविरूध्द त्यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपिलावर विचारविनिमय करून निर्णय घेणे.

मा.सभापती : अपीलाचा विषय आहे, या विषयाला मंजूरी देण्यांत येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सचिन हरिभाऊ गायकवाड (सद्यस्थितीत शिपाई) महानगरपालिका औरंगाबाद यांना कनिष्ठ लिपीक या पदावरून शिपाई या पदावर पदावनत केल्यासंबंधीचे कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१६/१६६५ दिनांक १४/१०/२०१६ रद्द करण्यांत येत आहे. त्यांना पदावनत केल्याच्या तारखेपासून पुनश्चः कनिष्ठ लिपीक या पदावर पुर्ववत कायम करण्याचा निर्णय घेण्यात येतो. श्री.सचिन हरिभाऊ गायकवाड (सद्यस्थितीत शिपाई) महानगरपालिका औरंगाबाद यांनी स्थायी समिती समोर सादर केलेले अपील मंजूर करण्यांत येते. प्रशासनाने स्थायी समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी ताबडतोब करावी, यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**<u>विषय क्र. २०६ :</u>**

विषय : वार्ड क्र.६४ गुलमोहर कॉलनी येथील सेक्टर जे मधील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे ठेकेदार श्री.राहुल शांतीलाल जैन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.३१ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२३,५४,४५३/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-२०१८-AMCA-301716-२

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.०५, सिडको |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.६४ गुलमोहर कॉलनी येथील सेक्टर जे मधील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दि.१३/०३/२०१८ विषय क्र.३१३ र.रू.२५,८३,५२६/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.२४,६०,५०१/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | १३ एप्रिल २०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | १७ एप्रिल २०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | सहा (०६) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.राहुल शांतीलाल जैन | र.रू.२३,५४,४५३/- | अं.प.दरापेक्षा ४.३१ टक्के कमी दराने |
| ०२. | मे.पुजा कन्स्ट्रक्शन | र.रू.२४,६०,५०२/- | अंदाजपत्रकीय दराने |
| ०३. | श्री.अभिजीत अशोकराव चव्हाण | र.रू.२४,६०,५०२/- | अंदाजपत्रकीय दराने |
| ०४. | श्री.सदाशिव रंगराव चव्हाण | र.रू.२४,७२,८०४/- | अं.प.दरापेक्षा ०.५० टक्के जास्त दराने |
| ०५. | श्री.समीर सावजी | र.रू.२४,८७,८१३/- | अं.प.दरापेक्षा १.११ टक्के जास्त दराने |
| ०६. | श्री.अंगद अबुज | र.रू.२५,३७,०२३/- | अं.प.दरापेक्षा ३.११ टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | आहे. |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.राहुल शांतीलाल जैन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.३१ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२३,५४,४५३/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६४ गुलमोहर कॉलनी येथील सेक्टर जे मधील रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार श्री.राहुल शांतीलाल जैन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.३१ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.२३,५४,४५३/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०७ :**

विषय : शासनाच्या नाविन्यपूर्ण योजनेतून संत एकनाथ रंगमंदिर येथील ध्वनी व्यवस्थेचे काम करणे या कामाचे ठेकेदार ओव्हरसीज इलेक्ट्रॉनिक्स, पुणे यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५० टक्के कमी दराच्या निविदेप्रमाणे काम करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-२०१८-AMCA-285111-४

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | विद्युत विभाग |
| २ | कामाचे स्वरुप | संत एकनाथ रंगमंदिर येथील ध्वनी व्यवस्थेचे काम करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय, संत एकनाथ रंगमंदिर येथील विविध कामे करणेसाठी मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.२५३ दि.३१/०१/२०१८ रक्कम रू.१,९९,९६,३३८/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | ५०,००,०००/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | दै.लोकमत, दै.पुण्यनगरी, दै.लोकसंग्रह दि.२८/०२/२०१८ |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दि.०४/०८/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दि.१४/०८/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ३ (तीन) (चौथ्या वेळेस) |

(पात्र टेंडरदारांची माहिती खालीलप्रमाणे-)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | ओव्हरसीज इलेक्ट्रॉनिक्स, पुणे | ४२,२४,९९६.६२ | १५.५० टक्के कमी दराने |
| ०२. | ए.वाय.बी. इव्हेंटस् ॲंड मेडीया, औरंगाबाद | ४३,४९,९९६.५२ | १३.०० टक्के कमी दराने |
| ०३. | जे.डी.एन्टरप्राईझेस, पुणे | ४४,१४,९९६.४७ | ११.७० टक्के कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०१७-१८ (डी.पी.डी.सी.) |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | --- |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |
| सदर कामाचे दर १५.५० टक्के कमी आहे. या कामाचे अंदाजपत्रक व निविदा झाल्यानंतर या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींनी सभागृहाची पहाणी करून हॉल मधील ध्वनी व्यवस्थेसाठी काही आवश्यक बाबींचा या कामात समावेश करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केलेले आहे. वरील निविदा कमी दराच्या असल्यामुळे होणाऱ्या बचतीमधुन उपलब्ध अनुदान रू.५०.०० लक्ष पर्यंत काम करण्यास मा.स्थायी समितीच्या विचारार्थ / मान्यतेस्तव सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाच्या नाविन्यपूर्ण योजनेतून संत एकनाथ रंगमंदिर येथील ध्वनी व्यवस्थेचे काम करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार ओव्हरसीज इलेक्ट्रॉनिक्स, पुणे यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.५० टक्के कमी दराने काम करून घेणेस व करार करणेस तसेच १५.५ टक्के कमी निविदा दरामुळे होणाऱ्या बचतीमधून अतिरिक्त कामे करणेस व उपलब्ध अनुदान रू.५०.०० लक्ष पर्यंत काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०८ :**

प्रस्ताव सादर करीत आहेत की, वार्ड क्र.७८ विद्यानगर अंतर्गत संदेशनगर येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एस.एस.आर. २०१८-१९ नुसार र.रू.३४,४२,९००/-चे (जी.एस.टी. सह) तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.२३/०१/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदर कामाकरीता आर्थिक तरतुद ही मनपा अर्थसंकल्प २०१८-२०१९ मध्ये लेखाशिर्ष नविन कॉंक्रीट रस्ते, झोन क्र.०७ जी.बी.आर. पृष्ठ क्र.७२,अ.क्र.०८ र.रू.५५.०० लक्ष उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रू.३४,४२,९००/- मंजूरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७८ विद्यानगर अंतर्गत संदेशनगर येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.३४,४२,९००/- (जी.एस.टी. सह) च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद